# जनसंपर्क अधिकारी


पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोननं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १६१-२२** **दिनांक - ०५/०६/२०२२**

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाणे आवारामध्ये वृक्षारोपण

०५ जुन रोजी "जागतिक पर्यावरण दिनानिमित्त" मा. पोलीस आयुक्त यांचे सुचनेनुसार मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाणे आवारामध्ये वृक्ष लागवड करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने आज दिनांक ०५ जुन २०२२ रोजी आयुक्तालयातील काशिमिरा, नवघर, उत्तन, भाईंदर, पेल्हार, विरार, नालासोपारा, वसई, आचोळे व मांडवी या १० पोलीस ठाण्यांच्या आवारामध्ये जागेच्या उपलब्धतेनुसार एकुण १९५ वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. सदर लागवड करण्यात आलेल्या वृक्षांची यथोचित काळजी घेवुन सर्व झाडे जगली पाहिजेत याबाबत मा. पोलीस आयुक्त यांनी भावना व्यक्त केलेली आहे. त्याचप्रमाणे आगामी काळात बेवर्ली पार्क येथील नियोजी पोलीस मुख्यालयाचे आवारात व रामनगर येथील पोलीस आयुक्त कार्यालयाचे जागेमध्ये देखील नियोजनानुसार वृक्षारोपण करण्यात येणार आहे.






------------ooooooo-----------